दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक ३४० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.६ मार्च २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## पत्नीची हत्या करून फरार आरोपीला मुरुड पोलीसांनी केले जेरबंद

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तालुक्यातील राजपुरी ग्रामपंचायत मधील खोकरी भागात राहणारे एका आदिवासी कुटुंबातील एका व्यक्तीने जेवण बनवले नाही याचा मनात राग धरून त्याने आपल्या पत्नीचा गळा आवळून हत्या करून फरार झाला होता. तेव्हापासून मुरुड पोलीस या आरोपीच्या शोधात होते. अखेरीस सदर आरोपी राजपुरीच्या जंगलात लपून बसला असल्याची खबर पोलिसांना मिळाल्यानंतर त्याचा शोध घेऊन जेरबंद केले.

घटनेतील प्रमुख आरोपी उमेश रमेश वाघमारे (वय २६) हा पत्नीची हत्या करून फरार झाला होता.

एका खबऱ्याकडून सदरचा आरोपी राजपुरी डोंगरावरील जंगलात लपला असल्याची खबर मिळाली त्याद्वारे पोलीस निरीक्षक नितीन गवारे यांनी एक विशेष टीम तयार करून त्याचा शोध सुरु केला. यासाठी चार दिशेला हि पोलीस तैनात करण्यात आल्याने सदरच्या खून प्रकरणातिल आरोपीला पकडण्यात यश आले आहे.

# दिघी पोर्ट कंपनीने केलेल्या फसवणुकी विरोधात तक्रार दाखल

## स्थानिक भुमी पुत्रांना प्राधान्य द्या : आ. महेंद्र दळवी / आगरदांडा दिघी पोर्टवर शिवसैनिकांचा एल्गार

**दै.रायगड नगरी । राजीव नेवासेकर**

**कोर्लई :** मुरुड तालुक्यातील आगरदांडा-दिघी पोर्ट चे सुरू असलेले काम बेकायदेशीर आहे. येथिल स्थानिक भुमी पुत्रांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे. येथिल पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे तो सुद्धा बेकायदेशीर आहे. कोणत्याही खाजगी कंपन्यांना परवानगी शिवाय बंदोबस्त देता येत नाहीत. येथिल स्थानिक भुमी पुत्रांवर होत असलेला अन्याय सहन केला जाणार नाही. आठ दिवसांत जर पोर्ट कंपनी प्रशासनाने न्याय दिला नाही तर दिघी व आगरदांडा दोन्ही पोर्ट चालू देणार नाही. असे आमदार महेंद्रशेठ दळवी यांनी आज आगरदांडा-दिघी पोर्ट प्रशासनाला कडक शब्दात बजावले आहे.





स्थानिक पोर्ट कमिटीने दिलेल्या निवेदनाची गंभीर दखल घेऊन आज आगरदांडा–दिघी पोर्ट वर हजारो शिवसैनिकांसह आमदार महेंद्रशेठ दळवी यांनी स्थानिक भुमी पुत्रांच्या न्याय हक्कासाठी एल्गार केला.

लोकांची साडेपंधरा कोटी देणे दिघी–आगरदांडा पोर्ट कंपनी प्रशासनाने दखल घेऊन लवकरात लवकर द्यावे, स्थानिक भुमी पुत्रांवर होणारा अन्याय त्वरीत थांबवावे स्थानिकांना प्रथम प्राधान्य द्यावे अशा अनेक मागण्यांचे निवेदन आगरदांडा–दिघी पोर्ट कंपनी प्रशासनाला देण्यात आले.

दिघी–आगरदांडा पोर्ट कंपनीने केलेल्या फसवणूकी विरोधात आमदार महेंद्रशेठ दळवी यांनी मुरुड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. यावेळी मुरुड तालुक्यातील हजारो शिवसैनिक व पदाधिकारी आगरदांडा–दिघी पोर्ट वर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी विश्वासाने आदितीला पालकमंत्री पदाची जबाबदारी दिली आहे : खा.सुनील तटकरे

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रायगडच्या पालकमंत्री पदी अगदी विश्वासाने आदितीला जबाबदारी दिली आहे तर जो पर्यंत केंद्र सरकार मराठी भाषेला अभिजात दर्जा जाहीर करीत नाही तो पर्यंत मी लोकसभेमध्ये मराठी मध्येच भाषण करीत राहणार असल्याचे वक्तव्य रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केले, बोर्ली पंचतन येथील ग्रुपग्रामपंचायतीच्या नूतन इमारतीच्या लोकार्पण प्रसंगी आयोजित कार्यक्रमा प्रसंगी ते बोलत होते.



श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन येथील ग्रुपग्रामपंचायतीच्या नूतन इमारत बांधकामासाठी खासदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम २०१९–२० मधून २५ लक्ष रुपये निधीतून उपलब्ध करून देण्यात आले या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर सदर इमारतीचा लोकार्पण समारंभ रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी महमद मेमन, जिल्हापरिषद सदस्या सायली तोंडलेकर, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष दर्शन विचारे, उपाध्यक्ष सुचिन किर, माजी सभापती सुकुमार तोंडलेकर, लाला जोशी, स्वाती पाटील, सरपंच ज्योती परकर, उपसरपंच नंदकिशोर भाटकर, माजी सरपंच रउफ मुकादम, फारूक दामाद, ज्योत्स्ना हेदुकर, माजी उपसरपंच लिलाधर खोत, मंदार तोडणकर, सर्व ग्रापंचायत सदस्य– सदस्या, दिवेआगर सरपंच उदय बापट, हरेश्वर .../२

## कोविड काळापासून आपल्याला आरोग्याचे अधिक महत्व कळले : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राजकीय, सामाजिक व समाजातील सर्व सेवाभावी संस्थांनी सध्याच्या परिस्थितीत जास्तीत जास्त प्रमाणात रक्तदान व आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यासंदर्भात शासनाने वेळोवेळी आ–वाहन केले आहे. कोविड काळापासून आपल्याला आरोग्याचे अधिक महत्व कळले. रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी विविध संस्थांच्या माध्यमातून केलेल्या रक्तदान व आरोग्य शिबिराचे आयोजनातून समाजात एक आदर्श निर्माण होतो. रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिरांच्या आयोजसाठी सामाजिक संस्थांनी पुढे येणे गरजेचे असते. त्यांचा आदर्श घेऊन आपले मित्र, आप्तेष्ट, नातेवाईक व समाजातील सर्व घटक अशा उपक्रमांना हातभार लावतात, असे प्रतिपादन पनवेल महापालिकेचे विरोधीपक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी केले. ते आज (शनिवार दि.५ मार्च) पनवेल परिसरातील करंजाडे वसाहतीत सिरवी समाज सेवा संस्था करंजाडे पनवेल यांच्या माध्यमातून आयोजित केलेल्या रक्तदान व आरोग्य शिबिराच्या .../२



## संक्षिप्त...

### अनिल देशमुख यांची चौकशी सुरूच

**दै.रायगड नगरी । मुंबई**

माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांनी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केलेल्या १०० कोटींच्या वसुलीच्या आरोप प्रकरणात सीबीआयला देशमुख यांच्याकडे पुन्हा एकदा चौकशी करण्यास परवानगी मिळाली आहे. त्यानुसार गुरुवारपासून सीबीआयने आर्थर रोड कारागृहात देशमुख यांच्याकडे चौकशीला सुरुवात केली आहे. शुक्रवारी पथक पुन्हा आर्थर रोड कारागृह गाठून देशमुख यांची चौकशी केली. माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांनी केलेल्या १०० कोटींच्या वसुलीच्या आरोप प्रकरणात ईडीने देशमुख यांच्याविरोधात मनी लाँड्रिंगचा गुन्हा नोंदविला होता. या गुन्ह्यात देशमुखांना अटक करण्यात आली. दुसरीकडे चांदीवाल आयोगासमोरील चौकशीदेखील अंतिम टप्प्यात आहे. यातच सीबीआयने त्यांच्याकडे पुन्हा चौकशी करण्यासाठी परवानगी द्यावी, याबाबत सत्र न्यायालयात अर्ज केला होता. सत्र न्यायालयाकडून ३ ते ६ तारखेपर्यंत चौकशी करण्यास परवानगी मिळाली आहे. त्यानुसार गुरुवारी सीबीआयचे पथक आर्थर रोड कारागृहात त्यांच्याकडे चौकशीसाठी गेले होते. शुक्रवारी पुन्हा पथक कारागृहात दाखल झाले. त्यांच्याकडे चौकशी करत त्यांचा जबाब नोंदवण्यात येत आहे.

## रायगड जिल्हा तांदूळ व धान्य महोत्सव पनवेल येथे सुरू



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र शासन कृषी विभागामार्फत कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) रायगड व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हा तांदूळ व धान्य महोत्सवाचे आयोजन दिनांक ४ ते ६ मार्च रोजी पन–वेल येथे करण्यात आले आहे. यात रायगड जिल्ह्यातील अनेक तालुक्यातील शेतकरी व महिला बचतगट यांनी या प्रदर्शन व विक्री महोत्सवात सहभाग घेतला आहे.

रायगड जिल्ह्यातील शेतकरी वर्गाने आपल्या शेतातील सेंद्रिय भाजीपाला व इतर शेतमाल ज्यात ताजा भाजीपाला, फळे, फळभाज्या, कंदमुळे, वेगवेगळी कडधान्ये इत्यादी अनेक पदार्थ विक्रीसाठी ठेवले आहेत. सेंद्रीय शेतकरी गटांना शेतमाल विक्री करण्यासाठी या महोत्सवात प्राधान्याने स्टॉल उपलब्ध करून देण्यात आले असून त्यामुळे सेंद्रिय शेतमाल विकत घेणारे नवनवीन ग्राहक मिळण्यास त्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होत आहे. या महोत्स–वात महाराष्ट्र शासन कृषी विभागामार्फत रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून खरीप हंगामात विविध योजनेंतर्गत भात पीक प्रात्यक्षिकामधून उत्पादित झालेले लाल, काळा, जांभळा भात तसेच इतर सुवासिक– इंद्रायणी, बारीक जातीच्या–वाडा कोलम, शुभांगी वाय एस आर इ. तांदळाची थेट शेतकऱ्यांकडून योग्य दरात ग्राहकांना विक्रीसाठी योग्य बाजारपेठ उपलब्ध करून दिली असल्याने शेतकरी समाधानी दिसत आहेत.


महिला बचत गटातील महिलांनी स्वतः तयार केलेले पापड, लोणचे, मसाला, लाकडी घाणीवर नैसर्गिकरीत्या तयार केलेले तेल, प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ, वेगवेगळे मसालेदार काजू, आवळा सरबत, कोकम, आगळ, आवळा पेठा, नाचणीचे व इतर अनेक धाण्यांचे पापड, लसूण कांदा चटणी इत्यादी अनेक पदार्थांची .../२

> प्रदर्शनाच्या जाहिराती या पनवेल शहरात केल्यास या प्रदर्शनास नागरिकांची मोठी गर्दी होईल व शेतकरी व महिला बचत गट यांनी विक्रीस आणलेला शेत माल विकला जाईल.
>
> **राहुल मुंडके प्रांत अधिकारी, पनवेल**

## रस्त्यावर ऑईल सांडल्याने वाहनांचा अपघात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल उरण नाका रोडवर गाढ़ी नदीवर शनिवारी दिनांक ५ रोजी दुपारच्या वेळेस अचानकपणे एका वाहनातून ऑईल सांडल्याने रस्ता निसरडा होऊन दहा .../२






# पेणची श्रध्दा पाटील युक्रेनहून सुखरूप घरी पोहचली

## वैकुंठ पाटील यांनी घेतली श्रध्दा पाटीलची भेट

**दै.रायगड नगरी । पेण**

मागील दहा दिवसांपासून रशिया आणि युक्रेन यांच्यामध्ये सुरू असलेल्या युद्धाकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागून राहिले आहे. शिक्षण व कामासंदर्भात अनेक देशांचे नागरिक युक्रेन मध्ये अडकलेले आहेत. आपल्या देशातील हजारो विद्यार्थी युक्रेनमध्ये अडकलेले असताना भारत सरकारने यशस्वी पाऊल टाकून मिशन गंगा ही योजना राबवून विद्यार्थ्यांना भारतात आणण्याचे प्रयत्न युद्ध पातळीवर सुरू केले आहे. या विद्यार्थ्यांमधील रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील श्रद्धा किशोर पाटील ही विद्यार्थिनी आज ( शनिवार दि.५) रोजी सकाळी सुखरूप आपल्या घरी पोहोचली आहे. श्रद्धाचे वडील किशोर पाटील यांनी श्रद्धा घरी सुखरूप आल्यानंतर भारत सरकारचे आणि विशेष करून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विशेष आभार मानले आहेत.

श्रद्धा पाटील ही युक्रेनमधील विनिस्थिया या ठिकाणी मागील वर्षभरापासून एम.बी.बी.एस.च्या पहिल्या वर्षातील शिक्षण घेत होती. मात्र अचानक रशिया आणि युक्रेन यांच्यामधील युद्धाच्या पार्श्वभूमीवर तिला आपले शिक्षण अर्धवट सोडून भारतामध्ये परतावे लागलेआहे. युक्रेनहून भारतामध्ये परतेपर्यंत कोणकोणत्या गोष्टी घडल्या आणि भारत सरकारने कशाप्रकारे प्रयत्न केले याची सविस्तर माहिती यावेळी श्रद्धा पाटीलने पत्रकारांशी बोलताना दिली. तर श्रद्धाचे वडील किशोर पाटील यांनी भारत सरकार आणि विशेष करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या सहकार्याबाबत त्यांचे आभार मानले.

यावेळी रायगड जिल्हा परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते तथा भाजप रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी श्रध्दाची घरी जाऊन भेट घेतली. यावेळी बोलताना वैकुंठ पाटील यांनी माजी मंत्री तथा विद्यमान आमदार रविशेठ पाटील यांच्या माध्यमातून आपण केलेल्या विनंतीनंतर आणि पत्रव्यवहारानंतर केंद्रीय नागरी हवाई उद्योगमंत्री पृथ्वीराज सिंधिया, केंद्रीय मंत्री नारायण राणे, केंद्रित पंचायत राज मंत्री कपिल पाटील, राज्याचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस व प्रवीण दरेकर यांनी तातडीने हालचाली करून पेणसह रायगडच्या विदर्थ्यांना सुखरूप परत आणण्यासाठी प्रयत्न केले असल्याचे सांगितले.

> अचानक युक्रेन आणि रशियातील युद्ध सुरू झाल्यानंतर ते भारताच्या सीमेपर्यंत येईपर्यंतचा प्रवास खूप भयावह होता. अनेक दिवस-रात्र बंकर मध्ये काढल्या. त्यावेळी अन्नपाण्यासाठी खूप हाल झाले. मात्र त्यानंतर भारत सरकारच्या माध्यमातून आम्हाला खूप चांगली मदत झाली म्हणूनच मी आज सुखरूप घरी पोहोचू शकले. परंतु शिक्षण अर्धवट सोडून यावे लागले याची देखील तेवढीच खंत वाटते.
>
> **- श्रध्दा पाटील, युक्रेन हून परतलेली भारतीय विद्यार्थिनी**



# श्रीवर्धन तालुक्यातील ४० गावात सुरू आहे ग्रामीण सक्षमीकरणाचे काम

**दै.रायगड नगरी । दिघी**

तालुक्यातील वाळवटी व चिखलप गावाला स्वदेस फाऊंडेशनच्या संस्थापक झरीना स्क्रूवाला यांनी स्वप्नातील व आदर्श गाव पाहण्यासाठी भेटी देण्यात येत आहे. स्वदेस फाऊंडेश तर्फे तालुक्यामध्ये ४० ग्रामपंचायतमधील ९६ गावामध्ये गाव विकास समितीच्या पुढाकाराने ग्रामीण सक्षमीकरणाचे काम सुरु आहे.

वाळवटी बौद्धवाडी –रोहिदासवाड, चिखलप बौद्धवाडी, गाणी कोंडे तर्फ श्रीवर्धन, दिवेआगर कोळीवाडा, नागलोली या पाच गावांमध्ये स्वप्नातील गाव हा प्रकल्प सुरु आहे. वाळवटी येथे झरीना स्क्रूवाला यांनी गाव विकास समितीच्या वतीने तयार करण्यात आलेला गाव विकास आराखडा व गाव समितीच्या कामकाजाची व गावामध्ये करण्यात आलेल्या विकास कामांची सखोल माहिती घेतली. गाव विकास समिती सदस्यांनी या वेळी सांगितले कि गावविकास समिती जर सक्षम असले तर गावाचा विकास शाश्वत होऊ शकतो व गाव आर्थिकद्रुष्टया संपन्न शकतो हे आम्ही संघटीतपणे करीत असलेल्या कामावर दिसत आहे.

महिला सक्षम व आर्थिक संपन्न होण्यासाठी प्रत्येक महिलेच्या कुटुंबामध्ये आर्थिक उत्पन्न वाढणे गरजेचे आहे. अशाच प्रकारे वाळवटीमधील सुभानी महिला बचत गट, महालक्ष्मी महिला बचत गट, संत रोहिदास महिला बचत गट, यशोमाता महिला बचत गट यांनी मागील वर्षभरात अनेक प्रकारचे उद्योग प्रशिक्षण घेऊन विविध प्रकारची



पदार्थ, लोणचे, पापड, मसाले बनवले व ते विकून चांगले पैसे मिळवले. यावेळी जसवली, वेळास व सतिचीवाडीमधील येथील उपस्थित असणाऱ्या युवक गटांना झरीना स्क्रूवाला यांनी मार्गदर्शन केले.

प्रबळ इच्याशक्तीच्या जोरावर वाळवटी बौद्धवाडी – रोहिदासवाडी या गावाने स्वदेस पाणी प्रकल्प, शौचालय, ग्रंथालय, शोष खड्डे, पशुपालन, शेळीपालन, कुकुट पालन, बचत गट घंटी असे अनेक उपक्रम राबविले आहेत. गाव स्वच्छ व नीट नीटके आहे यासाठी स्वदेस ग्राम विकास समितीचे अध्यक्ष समीर वाळवटकर, सुनील गमरे, गणेश जाधव, राहुल लोखंडे, मेघना येलवे, अश्विनी येलवे, आदिती गमरे, श्रेया लोखंडे, रुपाली वाळवटकर तसेच मुंबई मंडळ बचत गट व सर्व ग्रामस्थ यांच्या मेहनतीने या सर्व गोष्टींचा पाठपुरावा करून हे सर्व शक्य केले व आपल्या आदर्श गाव या संकल्पनेच्या द्रुष्टीने वाटचाल सुरु आहे. या सर्व कार्यक्रमाचे आयोजन स्वदेस ग्राम विकास समिती रोहिदासवाडी व बौद्धवाडी यांनी केले होते. वाळवटी भेटीनंतर झरीना स्क्रूवाला यांनी चिखलप मधील स्वदेस फौंडशनच्या सामुदायिक शेती व शेळीपालन या प्रकल्पना भेट दिली स्वदेस फौंडेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश वांगे, संचालक राहुल कटारिया, उपसंचालिका नीता हरमलकर, महाव्यवस्थपाक सुरेंद्र यादव, व्यवस्थपाक प्रदीप चिणके व मिलिंद आढाव तसेच स्वदेस पदाधिकारी उपस्थित होते.

# सीकेटी महाविद्यालयात रक्तदान शिबिर संपन्न; १११ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर महाविद्यालयात श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि डॉ. डी. वाय. पाटील रक्तपेढीच्या सहकार्याने शुक्रवारी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या हस्ते झाले, तर या शिबिराला जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत रक्तदान केलेल्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले.

सीकेटी महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. त्या अंतर्गत शुक्रवारी रक्तदान शिबिर झाले. या शिबिरात १११ विद्यार्थी आणि शिक्षकांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिराला उपमहापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक तेजस कांडपिळे, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, डॉ. डी. वाय पाटील रक्तपेढीच्या डॉ. प्राची नायर, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, आयक्युएसी समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, रूसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर, कलाशाखाधिपती डॉ. बी. एस. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे शाखाधिपती डॉ. एस. बी. यादव, विज्ञानशाखेच्या शाखाधिपती डॉ. ज्योत्स्ना ठाकूर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी सूर्यकांत परकाळे, कार्यक्रम अधिकारी गणेश साठे, सत्यजित कांबळे, डॉ. योजना मुनिव, अपूर्वा ढगे, आकाश पाटील आदी उपस्थित होते. या वेळी महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी सीकेटी विद्यालयात आयोजित विविध कार्यक्रमांमध्ये विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत असल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.



पृष्ठ क्र.१ वरुन...

## पालकमंत्री पदाची जबाबदारी दिली आहे : खा.सुनील तटकरे

सरपंच अमित खोत, चिंचबादेवी देवस्थान संस्था अध्यक्ष सुजित पाटील, मारुती गणपती देवस्थान संस्था अध्यक्ष सुशील पाटील, वांजळे उपसरपंच विलास दर्गे, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष संतोष गायकर, रविंद्र कुळकर्णी, डॉ निळकंठ जोशी, डॉ मोहसीन राऊत, वैद्यकिय अधिकारी डॉ सूरज तडवी, सर्व समाजाध्यक्ष, ग्रामविकास अधिकारी दिनेश रहाटे तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आपल्या मनोगतामध्ये खासदार सुनील तटकरे म्हणाले की, आपण प्रत्येक गावाला, वाडी वस्तीमध्ये विकास कामे करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे, या भागामध्ये पर्यटनावर आधारित व्यवसायाची वृद्धी व्हावी यासाठी आवश्यक प्रयत्नही केले आहेत यापुढे देखील होत रहातील, आपण घाऊक मध्ये काम करतो त्यामुळे आम्हाला कोणाची दिशाभूल करणे जमलेच नाही.

श्रीवर्धन तालुक्याचे क्रीडा संकुलाचे काम अपूर्णावस्थेत आहे हे काम लवकरच पूर्णत्वास जाईल व पालकमंत्री आदिती तटकरे या क्रीडा संकुलाचे १ मे ला सायंकाळी उदघाटन करेल असा विश्वास सुनील तटकरे यांनी व्यक्त केला या भागामध्ये काही लोक जनतेची दिशाभूल करण्याचे काम करीत आहेत येत्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा उमेदवार त्या विरोधकाची डिपॉझिट रक्कम जप्त होईल हे निश्चित आहे असेही ते म्हणाले. आम्ही दिवेआगर मध्ये सध्या कामे करतो हे खरय कारण याआधी कोणीतरी दिवेआगर गाव दत्तक घेतले होते परंतु तिथे शौचालय बांधण्या पलीकडे त्यांनी काहीच केले नाही त्यांना आम्हाला दाखवायचे आहे की आम्ही काय विकासकामे करतो असा टोला माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांना त्यांचे नाव न घेता लगावला. तसेच पुढील काला वधीमध्ये श्रीवर्धन मध्ये विकासकामांची उधळण होणार असल्याचे देखील खासदार सुनील तटकरे यांनी सांगताना आपल्या कन्येची बाजू मांडताना म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रायगडच्या पालकमंत्री पदी अगदी विश्वासाने आदितीला जबाबदारी दिली आहे असे सूचक वक्तव्य खासदार तटकरे यांनी केले.

तसेच खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते कोकण पर्यटन विकास कार्यक्रमंतर्गत सुमारे १५ लक्ष रुपये निधी मंजूर असलेल्या बोर्ली पंचतन जवळील डोंगरांमध्ये वांजळे गावातील मदगड किल्ला कडे जाणाऱ्या रस्त्याचे कामाचे भूमिपूजन करण्यात आले. तर खासदार तटकरे यांनी बोर्ली पंचतन येथील पुरातन गणपती देवस्थान मंदिराची पहाणी करून या मंदिराच्या जिर्णोद्धारसाठी तर आगरी समाज वाढीव सभागृहासाठी आवश्यक निधीची तरतुद करण्यात येईल असा विश्वास दिला.

## कोविड काळापासून आपल्याला आरोग्याचे अधिक महत्व कळले : प्रितम म्हात्रे

उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

सिरवी समाज सेवा संस्था करंजाडे पनवेल यांच्यावतीने करंजाडे येथील आईमाता मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त भव्य रक्तदान व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कोरोनाकाळात मोठ्या प्रमाणात रक्ताचा तुटवडा निर्माण झाला. त्यामुळे रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी सिरवी समाज सेवा संस्थेच्यावतीने रक्तदान शिबिर व आरोग्य शिबिराचे शनिवारी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत आयोजन करण्यात आले होते. पनवेल महापालिकेचे विरोधीपक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्याहस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच रामेश्वर आंग्रे, उपसरपंच योगेंद्र कैकाडी, ग्रामपंचायत सदस्य मंगेश बोरकर, अतुल पाटील, करंजाडे शिवसेना शहराध्यक्ष गौरव गायकवाड, श्री ससर्थ क्लिनिकचे डॉ.संकेत पवल, सिरवी समाज सेवा संस्थेचे अध्यक्ष थानाराम सिरवी, सचिव वोहाराम सिरवी, उपाध्यक्ष कान्हाराम सिरवी यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

सिरवी समाज सेवा संस्थेचे आरोग्य शिबिराचे यंदाचे चौथे वर्ष होते. रिलायन्स ब्लड बँक कोपरखैरणे यांच्या सहकार्याने हे रक्तदान शिबीर संपन्न झाले. याचबरोबर संध्याकाळी ५ ते ७ वाजेपर्यंत लहान मुलांचे कार्यक्रम, संध्याकाळी ७ ते ९ वाजेपर्यंत पाहुण्यांचे स्वागत, संध्याकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत महाप्रसाद अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

## रस्त्यावर ऑईल सांडल्याने वाहनांचा अपघात

ते बारा दुचाकी वाहने पसरल्याची घटना घडली.

काही वाहन चालकांना किरकोळ दुखापत झाली. वाहने घसरू लागल्याने ज्या ठिकाणी ऑईल सांडलेले होते. त्या रस्त्यावर पनवेल कोळीवाड्यातील तरुणांनी धाव घेतली व वाहनांना मार्ग दाखवीत तात्काळ पनवेल शहर पोलिसाना व अग्निशमन दलाला पाचारण केले व रस्त्यावर पनवेल महापालिका अग्निशमन दलाच्या जवानांनी पाणी मारले. यावेळी काही वेळ वाहतूक ठप्प झाली होती. पनवेल कोळीवाड्यातील तरुणामुळे अनेक वाहनचालकांचा जीव वाचला त्यामुळे त्या तरुणाचे वाहन चालकांनी आभार मानले.

## रायगड जिल्हा तांदूळ व धान्य महोत्सव पनवेल येथे सुरू

विक्री करण्यास ठेवले आहेत. शेतकऱ्यांसाठी कृषी तंत्रज्ञान परिसंवाद व चर्चा सत्र, शेतकरी उत्पादक ग्राहक परिसंवाद त्याचबरोबर कृषी विभागाच्या विविध योजनांचा प्रसार ही या प्रदर्शनाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. रायगडचे जिल्हाधिकारी यांच्या डॉ. महेंद्र कल्याणकर मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या तांदूळ महोत्सवात मोठ्या संख्येने नागरिक येऊन खरेदी करतील. त्यामुळे शेतकरी जो पिकवितो ते या ठिकाणी थेट ग्राहकांना विक्री करता येणार आहे. त्यामुळे ग्राहकांना सेंद्रिय शेत माल स्वस्त किमतीत विकत घेता येणार आहे. या प्रदर्शनाच्या जाहिराती या सोशल मीडियावर, रिक्षा वर जाहिराती द्वारे, पनवेल शहरात व आजूबाजूच्या ठिकाणी असलेले मॉल, मोठे मोठे कार्यालये येथे केल्यास त्यामुळे या प्रदर्शनास नागरिकांची मोठी गर्दी होईल व त्याचा फायदा हा येथील शेतकरी व महिला बचत गट यांनी विक्रीस आणलेला शेत माल विकला जाईल. त्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले पाहिजेत असे पनवेलचे प्रांत अधिकारी राहुल मुंडके यांनी यावेळी सांगितले.

यावेळी पनवेल प्रांत अधिकारी राहुल मुंडके, रायगड जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय काळभोर, रायगड आत्मा प्रकल्प उपसंचालक सतीश बोराडे, पनवेल खार संशोधन केंद्र शास्त्रज्ञ डॉ. विवेक वर्तक, माणगाव व अलिबाग कृषी उपविभागीय अधिकारी कैलास वानखेडे, खोपोली व महाड उपविभागीय कृषी अधिकारी बालाजी तोटे, पेण येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नियोजन अधिकारी आनंदकुमार नेमाडे, माजी पंचायत समिती सदस्य ज्ञानेश्वर बडे इत्यादी अनेक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# हॉटेलमधील मोबाईल चोरी करणाऱ्या इसमास अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

हॉटेलमधील टेबलावर एका ग्राहकाने ठेवलेले दोन मोबाईल चोरुन नेल्याची घटना घडली होती. याप्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी एका इसमास ताब्यात घेवून त्याच्याकडून चोरीचे मोबाईल हस्तगत केले आहेत. तालुक्यातील कल्हे गाव येथील किंग्स हॉटेलमध्ये एका ग्राहकाने त्यांच्या टेबलावर ओप्पो आणि व्हिवो कंपनीचे दोन मोबाईल फोन ज्याची किंमत एकूण २३ हजार रुपये इतकी आहे हे ठेवले असताना आरोपीने चलाखीने सदर मोबाईल फोन चोरुन नेले. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करताच वपोनि रवींद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.पो.नि.अविनाश पाळदे, एसआय मनोहर चव्हाण, पो.ना.राकेश मोकल, पो.कॉ. भिमराव खताळ, पो.कॉ.तुकाराम भोये आदींच्या पथकाने त्या हॉटेल परिसरात सीसीटीव्ही फुटेज तपासले असता त्यांना लाल रंगाचा टी–शर्ट परिधान केलेला एक व्यक्ती सदर मोबाईल चोरुन हॉटेल बाहेर पडल्याचे दिसून आले. त्यानुसार परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व गुप्त बातमीदाराद्वारे किरणकुमार शंकरअय्या कनाकम (३५ रा.खारघर) याला ताब्यात घेतले असता त्याने सदर मोबाईल चोरल्याचे कबुल करून मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात दिला आहे.

मुजावर सा़ो

अॅड.सुनील एन. मोरे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.३१६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१८/०४/२०२२

१) श्रीमती.कांचना नागेश पारळे
वय : ५३ वर्षे, व्यवसाय : घरकाम
२) कुमार.किरण नागेश पारळे
वय : ३१ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) कुमारी.कविता नागेश पारळे
वय : २८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
सर्व रा.एल.आय.जी.–२, रुम नं.बी.६८, सेक्टर ०१,
कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१८ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ हिचे पती व अर्जदार नं.२ व ३ यांचे वडील कै.नागेश दत्तू पारळे हे दि.०९/०१/२०२२ रोजी मु.पो.शिप्पुर तर्फे आजरा, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर येथे मयत झाले. तसेच अर्जदार नं.१ हिची सासू व अर्जदार नं.२ व ३ यांची आजी कै.पार्वती दत्तू पारळे या दि.२९/०१/२०१२ रोजी मु.पो.शिप्पुर तर्फे आजरा, ता.गडहिंगलज, जि.कोल्हापूर येथे राहत्या घरी मयत झाल्या असून त्यांच्या मृत्यूची नोंद सरकारी कार्यालयात केलेली नाही. कै.नागेश दत्तू पारळे यांच्या नावे खालील वर्णनाची मिळकत असून सदर मिळकत या सिडकोच्या अधिकार क्षेत्रात आहे. सदर मिळकती संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथील सिडको हद्दीतील, एल.आय.जी.–२, रुम नं.बी–६८, सेक्टर–१, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड**

वरील मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाचीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. सदरच्या नोटीसीस मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.५/३/२०२२ रोजी कोर्टाच्या सही–शिक्क्याने दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मे.पांडे साहेब

अर्जदारतर्फे वकील
अॅड.निकिता जाधव

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे सो.न्यायालयात

क्रिमिनल एम.ए.नं.२७६/२०२२
ने.ता.०७/०४/२०२२

श्री.युवराज रामकृष्ण घरत
वय : ४० वर्षे, धंदा : नोकरी
रा.घर नं.१३४३, मु.कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका
पनवेल विभाग,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

ज्यापेक्षा अर्जदार यांच्या मुलीचा जन्म दि.१८/०५/२०१३ रोजी मु.माऊली हॉस्पिटल कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेला आहे. म्हणून अर्जदार यांनी त्यांच्या मुलाच्या कु.एंजल युवराज घरत याच्या जन्माच्या तारखेची नोंद होणेकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू कु.एंजल युवराज घरत यांचा वर नमूद ठिकाणी जन्म झाला आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर जाहीर नाम्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की,

जर सदरहू मुदतीत कोणी हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.५/०३/२०२२ रोजी दिली.

**सही/– क.लिपीक फौ.न्याया, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल**

मे.मुजावर सा़ो. यांचे कोर्ट

प्रोसेस जमा रु.५०/– — अर्जदारातर्फे वकील अॅड.विकास अशोक बडे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.२०२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१३/०४/२०२२

१) श्री.उमेश रामचंद्र कांबळे — अर्जदार

सर्व तमाम लोकांस कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै.पुनम उमेश कांबळे यांचे दि.१४/०५/२०२१ रोजी सुयोग हॉस्पिटल, मार्केट यार्ड, दिंडोरी रोड, पंचवटी नाशिक, जिल्हा नाशिक येथे निधन झाले आहेत.

कै.पुनम उमेश कांबळे यांचे मालकी हक्कात आणि ताबे कब्जात पुढील वर्णन केलेली मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील ड्रिम कोरल या इमारतीमधील सदनिका मिळकत नं.६०३, सहावा मजला, प्लॉट नं.१३५, सेक्टर २, उलवे, ता.पनवेल, जिल्हा : रायगड. क्षेत्र २९.३०१ चौ.मी.**

मयत कै.पुनम उमेश कांबळे यांच्या पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या हक्काबाबत कोणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून वर नमूद मे.न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, वर नमूद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबाबत पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करतील व मयत कै.पुनम उमेश कांबळे यांचे वारस पत्रात अर्जदार हक्कदार आहेत असे शाबित झाल्यास त्यांना वारसदाखला मंजूर करील.

सदरची नोटीस आज दि.०५/०३/२०२२ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## देवयानी मोकल यांना शिक्षक रत्न पुरस्कार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सु.ए.सो.चे माध्यमिक विद्यालय भाताण– पनवेल या विद्यालयाच्या मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी तर्फे देवयानी प्रशांत मोकल यांना गुणवंत शिक्षक गुरू गौरव शिक्षक रत्न पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. कृतिशिल शिक्षिका देवयानी मोकल यांना सदर पुरस्कार अँड. कृष्णाजी जगदाळे (अध्यक्ष मावळा ट्रस्ट) यांच्या हस्ते नुकतेच प्रदान करण्यात आले.या वेळी पनवेल पंचायत समितीचे उपसभापती आणि स्कूल कमिटीचे चेअरमन वसंत काठावले, मुख्याध्यापक प्रशांत मोकल, उपाध्यक्ष जनार्दन घरत, सरपंच सुभाष भोईर, माजी सरपंच नंदकुमार मुकादम, स्कूल कमिटी सदस्य रंजना मोकल, किरण सते, सहशिक्षक गणेश दुर्गे, सारिका उकिरडे, मनिषा खंडाळीकर आदी मान्यवरांसह ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. देवयानी मोकल यांना सदर पुरस्कार शैक्षणिक कार्यातील मोलाचे योगदान, सतत नाविन्यपूर्ण उपक्रमाबाबत देण्यात आला आहे.देवयानी मोकल यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. संस्थेचे अध्यक्ष वसंत ओसवाल, उपाध्यक्ष रविंद्र लिमये, सचिव रविकांत घोसाळकर यांनीही त्यांचे विशेष कौतुक केले आहे. देवयानी मोकल यांनी सदर पुरस्कार आपले वडील स्वर्गीय बाळाजी दामोदर पिंगळे यांना समर्पित केला आहे.



## रायगड औद्योगिक पेन्शनर वेलफेअर असोसिएशन वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । तळा**

रायगड औद्योगिक पेन्शनर वेलफेअर असोशिएशन खा–लापूर जिल्हा रायगड संघटनेची सर्व साधारण सभा २०–२१ ची कोरोना (महामारी) संक्रमण काळ असल्याने सदर सभा शासकीय नियमांचे निर्बंध असल्याने सदर सभा मंगळवार दि ८ मार्च २२ रोजी कुणबी भवन माणगांव येथे आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा सचीव श्रीराम वळवणकर व माणगांव युनिट अध्यक्ष बाळकृष्ण अंबुर्ले यांनी केले आहे. सभेपुढील कामे– मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूरकरणे, २०–२१सालाचा अहवाल आर्थिक पत्रके मंजूर करणे, ऑडिट अहवाल वाचन, २१–२२ जमा खर्चास अंदाज पत्रकास मान्यता देणे, ऑडीटरची नियुक्ती करणे, जिल्हा कार्यालय उभारणीसाठी निधी संकलन, तरतुदी बाबत विचार विनिमय करणे मा.अध्यक्ष सो. यांच्या परवानगीने येणारी कामे अशी सभेपुढील कामांचा विचार केला जाणार आहे. असे संघटनेच्या पदाधिकारी यांनी कळविले आहे. तरी उपस्थित रहावे.

# पेण होलिकोत्सव ; प्रचलित गगनचुंबी होळ्यांची जय्यत तयारी

## कोरोनाच्या सावटानंतर प्रथमच उंच उंच होळ्या ठरणार तालुक्यासह जिल्ह्याचे आकर्षक

**दै.रायगड नगरी । पेण**

फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी संपूर्ण देशभरात साजरा होणारा होलिकोत्सव रायगड जिल्ह्यासह कोकणात मोठया उत्साहात साजरा करण्यात येतो. कोकणातील अनेक वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीने होलिकोत्सव साजरा केला जातो. तर रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यात कोळीवाड्यात हा उत्सव आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. या ठिकाणी मोठमोठ्या गगनचुंबी व उंच उंच होळ्या उभारून उत्सव साजरा केला जातो. कोरोनाच्या सावटानंतर गेल्या २ वर्षानंतर प्रथमच या उत्सवाची जय्यत तयारी आत्तापासूनच सुरू झालीआहे.



होलिकोत्सवाच्या या उत्सवाला शिमगोत्सव असे देखील म्हटले जाते. पेण तालुक्यात १० ते १५ दिवस अगोदरच या उत्सवाची उत्कंठा शिगेला लागलेली असते. होलिकोत्सवाची तयारी करणे, गावातील घराघरांत वर्गणी मागणे, ज्या ठिकाणी उत्सव साजरा होणार आहे तेथील स्वच्छता – सुशोभीकरण करणे, होळी पेटविण्यासाठी लागणारी लाकडे – ओंडके गोळा करणे, होळी उत्सव पाहण्यासाठी येणाऱ्या नागरिकांमध्ये विविध प्रकारची जनजागृती करण्यासाठीच्या योजना आखणे आदी प्रकारची जय्यत तयारी आत्तापासूनच पेणमधील विविध विविध मंडळे व नागरिक करत आहेत.

रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्याचा विचार करता पेणमध्ये मोठमोठ्या गगनचुंबी होळ्या उभारल्या जातात. जवळपास ७० ते १०० फूट उंच अशा या गगनचुंबी होळ्या पाहण्यासाठी तालुक्यातीलच नव्हे तर बाहेरील नागरिक देखील पेण मध्ये मोठ्या संख्येने हजेरी लावत असतात.

या होळ्या उभारण्यासाठी बाजूच्या जंगलातून सावरीच्या झाडाचा ओंडका आणला जातो. हा ओंडका आणताना जोरजोरात बोंब मारणे, नाचगाणे करणे व जंगल भोजन करणे अशा प्रकारे ढोल ताशांच्या गजरात ही होळी आणली जाते. या आणलेल्या होळीला मखराची सजावट केली जाते. मखर जोडल्यानंतर ही होळी उभी करण्याची खरी मोठी कसरत असते. जवळपास दीडशे ते दोनशे लोकं एकत्र येऊन मोठ्या गाजावाजात आणि अतिशय शिताफीने ही होळी उभी केली जाते. त्यावेळी देखील असंख्य नागरिक हा चित्तथरारक क्षण पाहण्यासाठी उपस्थित असतात.

पेण शहरामधील कोळीवाडा, कुंभार आळी, नंदीमाळ नाका, कउंडाळ तलाव, बाजारपेठ तर ग्रामीण भागातील दादर, जोहे, वाशी, रावे, पाबळ, हमरापूर, वडखळ, गडब, जिते आदी ठिकाणच्या होळ्या नागरिकांसाठी आकर्षण ठरत असतात. त्यापैकी कोळीवाडा येथील होलिकामाते जवळील कोळी गीते आणि त्यावरील सुरू असणारे कोळीडान्स तसेच तेथे असणारी ८० किलोची दगडाची गोटी उचलण्याची स्पर्धा हे एक वेगळेच आकर्षण असते.

साधारण १० ते १५ दिवस जय्यत तयारी करून उभारण्यात आलेल्या या होळीचे होळीपौर्णिमेच्या दिवशी पूजन करून आणि विशेष महत्त्व असणाऱ्या पुरणपोळीचे नैवेद्य दाखवून मध्यरात्री बारा वाजता या होळीला आरती करून झाल्यावर अग्नी देण्यात येते. होळी पौर्णिमेनंतर सलग पाच दिवस म्हणजेच रंगपंचमी पर्यंत या होळीची अग्नी सतत तेवत ठेऊन या ठिकाणी विविध कार्यक्रम आयोजित करून आणि या अग्नीवर विविध प्रकारचे पदार्थ तयार करून या होळीच्या माळावर होळी उत्सव साजरा केला जातो. जळालेली होळी काढून पाण्यात विसर्जन करताना सुद्धा गावकऱ्यांची कसरत होते.

## कोविड आपत्तीमुळे विधवा झालेल्या महिला भगिनींना प्रशिक्षण शिबीर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जिल्हाधिकारी डॉ महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली मिशन वात्सल्य योजनेअंतर्गत कोवीड आपत्तीमुळे विधवा झालेल्या भगिनींसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले.




जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी व तहसीलदार कार्यालय पनवेल यांचे विद्यमाने पनवेल येथील पंचायत समिती सभागृहात कोविड आपत्तीमुळे विधवा झालेल्या महिला भगिनींचे प्रशिक्षण शिबीर ५ मार्च रोजी आयोजित करण्यात आले. यामध्ये युवा प्रतिष्ठान या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून महिलांसाठी विनामूल्य कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात आले. महिलांनी प्रामुख्याने नर्सिंग, कॉम्पुटर, मोबाईल दुरुस्ती, वाहन चालक, डिलिव्हरी गर्ल, टेलरिंग इत्यादी कोर्सेस साठी ५० सहभाग नोंदवला.

## २०२१ मध्ये पनवेल तालुक्यात सापडले १७८ कुष्ठरुग्ण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कुष्ठरुग्ण इतर रोगांपेक्षा थोडा वेगळा असला तरी लवकर निदान आणि योग्य उपाययोजना करून रोग बरा करणे शक्य आहे. यासाठी शासन स्तरावर उपाययोजना केल्या जात आहेत. २०२१ मध्ये पनवेल तालुक्यात १७८ कुष्ठरुग्ण सापडले आहेत. यातील ९१ रुग्ण बरे झालेले असून ६४ रुग्णावर उपचार सुरु आहेत.

२०२० मध्ये पनवेल तालुक्यात १८७ कुष्ठरुग्ण सापडले होते. कुष्ठरोग निर्मूलनाबाबत जनतेमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती होत गेल्यामुळे जनतेचा कुष्ठरोगी व्यक्तीकडे बघण्याच्या दृष्टीकोनात हळुहळू फरक पडत आहे. मात्र, कुष्ठरोग रोग सर्वसामान्य आहे. समाजाने वुष्ठपिडीत व्यक्तींना स्वीकारावे याबद्दलची मानसिकता बदलण्यास काही काळ जावा लागेल. कुष्ठरोग सावकाश पसरणारा जिवाणूजन्य आजार आहे. याचा परिणाम त्वचा, हातातील आणि पायातील परिघवर्ती चेता, नाकाची अंतत्वचा, घसा आणि डोळ्यावर होतो. चेतांच्या टोकावर परिणाम झाल्याने परिणाम झालेल्या भागाची संवेदना नष्ट होते. संवेदना नाहिशी झाल्याने हाता–पायाची बोटे वाकडी होतात किंवा गळून पडतात. त्वचेवर न खाजणारा आणि बधिर चट्टा आल्यास किंवा हातापायास मुंग्या, बधिरपणा आल्यास किंवा त्वचा लालसर चमकदार दिसू लागल्यास ताबडतोब तज्ञ डॉक्टरांकडून तप–ासणी करणे आवश्यक आहे. रोगाचे निदान झाले तरी घाबरण्याचे कारण नसते. यावर प्रभावी औषधे उपलब्ध आहेत. त्यामुळे कुष्ठरोग पूर्णपणे बरा होतो.

## कोलाड विभागात वीस अंगणवाडी केंद्रात पोषण आहार पोटलीचे वाटप

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

कोलाड विभागातील वीस अंगणवाडी केंद्रात पोषण आहार पोटलीचे वाटपाचा कार्यक्रम ता.४ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

रायगड जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या निर्धारातून आदिवासी बांधवांच्या विकासाच्या दृष्टिकोनातून केलेल्या सप्तसुत्री कार्यक्रमाचे प्रभावी अंमलबजावणीचा भाग म्हणून एकात्मिक बालविकास सेवा अंतर्गत अन्नदा तर्फे स्वामीराज फाउंडेशनच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यातील विविध अंगणवाडी केंद्रातिल ६ महीने ते ६ वर्ष वयोगटातील कुपोषित बालकाना पौष्टीक आहाराचे वाटप करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. त्याच उपक्रमाचा एक भाग म्हणून पोषण आहार पोटली वाटपाचे काम चालू आहे.तर कोलाड विभागातील २० अंगणवाडी केंद्रातील कुपोषित मुलांसाठी ५;किलोच्या ३१५ पोषण पोटलीचे वाटप कोलाड अंगणवाडी केंद्रात सम्पन्न करण्यात आले.

या माध्यमातून उत्तम आहार व शिक्षणाचे महत्व सांगण्यात आले.सदर कार्यक्रमालाअन्नदाचे दिपेश सर, रोहा आंगनवाड़ी बिट सुपरवायर सौ घाडगे, तलाठी मनोरे, स्वामीराज फाउंडेशनचे अध्यक्ष जयेश माने,फाउंडेशन कार्यकारी सदस्य उमेश वादल, राजेश जाधव, खजिनदार मारुती चव्हाण, महिला सक्षमीकरण अध्यक्ष संजीवनी माने , सह खजिनदार विनायक माने व कोलाड बिट मधील सर्व आंगनवाडी सेविका उपस्थित होत्या. बालकांचे आरोग्याच्या दृष्टीने कुपोषित बालकांना संबंधितांकडून पोषण अहाराचे वाटप करण्यात आल्याने पालकवर्गाकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


मा.श्री.सोनावणे सो

अॅड.सुनील एन. मोरे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.२८६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२९/०४/२०२२

१) श्रीमती.जानकी श्रीधरन वालीयापारामबील
वय : ७८ वर्षे, व्यवसाय : काहीही नाही
२) सौ.बबिता अनिलकुमार
वय : ५४ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
अर्जदार नं.१ व २ रा.फ्लॅट नं.००२, हरी ओम डेव्हलपर्स,
प्लॉट नं.२६, सेक्टर ०४, कळंबोली,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१८
३) श्रीमती.ललिता गोपी नारायणापरबत
वय : ६० वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.के.एल.६ अे, बिल्डींग नं.४, रुम नं.६, सेक्टर १ ई,
कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२१८
४) सौ.शैलजा शशिकांत दळवी
वय : ५८ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.टाईप–३ बी, बिल्डींग नं.४४, रुम नं.४५६,
आर.सी.एफ.कॉलनी, चेंबुर, मुंबई–४०००७४ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ हिचे पती व अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील कै.व्ही.व्ही.श्रीधरण हे दि.०५/०५/२०१० रोजी मुंबई येथे मयत झाले. तसेच अर्जदार नं.१ हिची सासू व अर्जदार नं.२ ते ४ यांची आजी कै.कल्याणी व्ही.वालियापारामबील या दि.१५/०८/१९३७ रोजी त्रिशुर, केरळ, वालियापारामबील हाऊस, पी.ओ.पुलुट, केरळ–६८०६६३ येथे मयत झाले आहेत. कै.व्ही.व्ही.श्रीधरण यांच्या नावे खालील वर्णनाची मिळकत असून सदर मिळकत या सिडकोच्या अधिकार क्षेत्रात आहे. सदर मिळकती संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे.कोर्टात केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथील सिडको हद्दीतील, सदनिका नं.००२, तळमजला, के विंग, प्लॉट नं.२६, साई नगर, सेक्टर ४, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड**

वरील मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाचीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. सदर नोटीसीस मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.५/३/२०२२ रोजी कोर्टाच्या सही–शिक्क्याने दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मे.राव साहेब कोर्ट

अॅड.योगिता पाटील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१४५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१३/०४/२०२२

१) श्रीमती.सुमेधा रवींद्र राऊत
वय : ६७ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.इ टाईप–१२/१–१, अभ्युदय को.बँकेजवळ,
से.१८, न्यू पनवेल ४१०२०६
२) श्री.अलंकार रवींद्र राऊत
वय : ३४ वर्षे, व्यव : नोकरी
रा.इ टाईप–१२/१–१, से.१८, न्यू पनवेल ४१०२०६ अर्जदार
विरुद्ध
१) सौ.अश्विनी बि. हिवसे
वय : ४० वर्षे, व्यव : गृहिणी
रा.४०२, वेदश्री हाइटस, एवरशाईन सिटी,
एस.के.सी.स्कूल मागे, वसई पुर्व–४०१२०८
२) सौ.अक्षता कौस्तुभ भट्टे
वय : ३९ वर्षे, व्यव : नोकरी
रा.भट्टेवाडी, एस.एन.दुबे रोड, रोड थॉमस स्कूल,
रावल पाडा जवळ, दहिसर पुर्व–४०००६८ सामनेवाला

ज्यापेक्षा मयत कै.श्री.रवींद्र मोरेश्वर राऊत ह्यांचा मृत्यू दि.२०/०८/२०२० रोजी इंद्रावती हॉस्पिटल, ऐरोली, नवी मुंबई येथे झाला आहे. अर्जदार क्रं.१ ह्या मयत कै.श्री.रवींद्र मोरेश्वर राऊत यांच्या पत्नी आहेत आणि अर्जदार क्रं.२ हा मुलगा आहे. तसेच सामनेवाला क्रं.१ व २ या मुली आहेत. अर्जदार यांनी खालील मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

**मिळकत धारकाचे नाव मयत : कै.श्री.रवींद्र मोरेश्वर राऊत**
E-type 12/1-1,
Near Abhyudaya Co-op Bank,
Sector-18, New Panvel 410206
admeasuring area of 3847.00 Sq. Mtrs.
The purchase Value of the said Flat is Rs.84,390/-
(Rupees Eighty Four Thousand Threee Hundred Ninety Only)

यासाठी सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार हे मयताचे वारसदार नाहीत असे कोणास समजविण्यास असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.कोर्टात हजर राहून आपली हरकत कळवावी आणि या लेखी नोटीस वरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी हरकत दाखल न केल्यास सदरहू कोर्ट या अर्जदारास ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत कै.श्री.रवींद्र मोरेश्वर राऊत यांचा वारस घोषित करेल. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन मा.कोर्ट अर्जदार यांस वारस प्रमाणपत्र प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.५/०३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



राव साहेब

अर्जदारातर्फे वकील
धनश्री मा. पाटील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.७१५/२०२१
नि.नं.१४/ड
ने.ता.१३/०४/२०२२

१) श्री.पांडुरंग दगडू कोळी
वय : ६५ वर्षे, धंदा : निवृत्त
रा.रुम नं.११, बिल्डींग नं.४२, पीएल ५,
सेक्टर १७, नवीन पनवेल, ता.पनवेल
२) श्री.दत्ताराम दगडू कोळी
वय : ६२ वर्षे, धंदा : निवृत्त
रा.रुम नं.२, प्रथमेश बिल्डींग, गणेश नगर रोड,
अपूर्वा हॉटेल, गणेश नगर, नवीन रिस, रिस, मोहपाडा
३) सौ.कुसूम गोपीनाथ कोळी
वय : ५३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मोहा, घर नं.३७, साईनाथ मंदिराजवळ,
पो.तरघर, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
श्री.जगन्नाथ दगडू कोळी (मयत) तर्फे वारस
१) सौ.अभिलाषा राजेश ठाकूर
वय : ४३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रुम नं.१, तळमजला, वैष्णव महिमा को.ऑ.हौ.
सोसायटी, प्लॉट नं.८९,९०,९३,९४, सेक्टर ९,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.विभुती संजय तांडेल
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
३) श्री.राहूल जगन्नाथ कोळी
वय : ३४ वर्षे, धंदा : नोकरी
२ व ३ रा.श्री सद्गुरु कृपा निवास, प्लॉट नं.३,
घर नं.१९६ (१), सुकापूर, पालीदेवद,
ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाले

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी दगडू महादेव कोळी हे दि.२५/०७/१९९४ रोजी मरण पावले आहेत व ज्याअर्थी सदर मयत दगडू महादेव कोळी यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीची पुढीलप्रमाणे मिळकत आहे.

**संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| १ | ४१५ | ९ | ५ | ०–३५–१२ |

सदर मिळकत अर्जदारांचे नावे होण्याकरिता त्यांनी कै.दगडू महादेव कोळी यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता त्याने मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्याचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारास त्याचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.०५ माहे ०३ सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



राव साहेब

अर्जदारांचे वकील : अॅड.रंजन सुर्यकांत पाटील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.२८७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१३/०४/२०२२

१) श्री.रमेश जनार्दन मुंगाजी
वय : ६२ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.समर्थ नगर, मु.रामवाडी, पो.पेण, ता.पेण, जि.रायगड
२) श्री.चंद्रकांत जनार्दन मुंगाजी
वय : ५६ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.वनिता बाळाराम घरत
वय : ५९ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.१२९/४, ई.एस.आय.सी.क्वॉटर्स, सेंट्रल रोड,
एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे समोर, एम.आय.डी.सी.,
अंधेरी, मुंबई चकाला, एम.आय.डी.सी. महाराष्ट्र ४०००९३
४) श्रीमती.सुरेखा परशुराम ठाकूर
वय : ४६ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.चिर्ले, पो.जासई, ता.उरण, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, अर्जदार क्र.१ व २ हे मयत शोभा जनार्दन मुंगाजी यांची मुले असून अर्जदार क्र.३ व ४ ह्या मयत शोभा जनार्दन मुंगाजी यांच्या विवाहित मुली आहेत. कै.शोभा जनार्दन मुंगाजी ह्या दिनांक २३ माहे नोव्हेंबर सन २००७ रोजी मयत झालेल्या आहेत. कै.शोभा जनार्दन मुंगाजी ह्या हयात असाना त्यांच्या मृत्यूसमयी त्यांचे नावे असणारी, मालकीची, ताबेकब्जा, वहिवाटीतील व कसवणुकीतील जमीन मिळकत आहे. त्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) | युनिट केस क्र. |
|---|---|---|---|---|
| १६३ | ६ | ०.२३.६ | ०४.४४ | ओवळे–LAAR ६३ |

उपरोक्त वर्णन केलेली जमीन मिळकत ही पनवेल बंदरापलिकडील आणि ठाणे खाडीपलिकडील भूभागाच्या औद्योगिक, वाणिज्यिक व निवासी प्रयोजनासाठी आणि सुनियोजित विकासनाकरिता महाराष्ट्र शासनातर्फे सिडकोने ''नवी मुंबईचे शहर'' या नावाने शासनाने स्थळनिर्देशित केलेल्या व विशेषत्वाने नवी मुंबई प्रकल्पांतर्गत उभारण्यात येणाऱ्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी नवीन भूसंपादन अधिनियमाच्या कलम २६ ते ३० अन्वये परिगणना करून अर्जदार व मयत शोभा जनार्दन मुंगाजी यांचे करिता गावाचे नाव : ओवळे, युनिट केस क्र.LAAR १७ ने निवाडा घोषित केलेला होता. तसेच शासन निर्णय क्र.सीआयडी–१८१२/प्र.क्र.२७४/नवी–१०, दि.०१/मार्च २०१४ च्या परिशिष्टानुसार मिळणाऱ्या मोबदल्यानुसार अर्जदार व मयत शोभा जनार्दन मुंगाजी यांच्या करिता गावाचे नाव : ओवळे, युनिट केस क्र. LAAR ३६ ने निवाडा घोषित केलेला आहे. तथापी, पनवेल दिवाणी न्यायालय येथे आयोजित राष्ट्रीय लोकअदलात मंचासमोर भूसंपादन वादपूर्व प्रकरण क्र.३८/२०१७ मध्ये अर्जदार हे पक्ष क्र.१ म्हणून, तसेच उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्र.१ हे पक्ष क्र.२ म्हणून आणि शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको) हे पक्ष क्र.३ म्हणून मा.लोकन्यायालयासमोर सामोपचारानर तडजोड होवून अर्जदार यांना निवाडा LAAR ३६ प्रमाणे लाभ मिळणार आहेत. मात्र प्रस्तुत तडजोडनाम्यातील अट क्र.७ अन्वये निवाड्यातील अर्जदार यांचेपैकी कै.शोभा जनार्दन मुंगाजी या मयत झालेल्या असल्याने त्यांचे वारस म्हणून सक्षम दिवाणी न्यायालयाचा वारस दाखला सिडकोकडे दिल्यानंतरच त्यांना प्रस्तुत तडजोडीप्रमाणे देय लाभ देण्यात येतील.

वर वर्णन केलेल्या मिळकतीस कै.शोभा जनार्दन मुंगाजी यांच्या पश्चात त्यांस अर्जदार हेच वारस आहेत. वरील प्रमाणे जमीन मिळकतीचे वर्णन असून सदरहू जमीन मिळकती अनुषंगाने वारस दाखला मिळणे करिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे कै.शोभा जनार्दन मुंगाजी यांचे वारस नाहीत अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.न्यायालयात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही, असे गृहीत धरुन मे.न्यायालय अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०५/०३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## वरसगांव येथे अखंड हरिनाम सप्ताहास भक्तीमय वातावरणात प्रारंभ

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

गेली अनेक वर्षांची यशस्वी परंपरा राखत सुरु असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण या धार्मिक कार्यक्रमास महाशिवरात्री पर्वास मोठ्या भक्तीमय वातावरणात प्रारंभ करण्यात आला आहे.

या अखंड हरिनाम सप्ताहास दोन वर्षे कोरोनो महामारीमुळे खंड पडला होता.परंतू या वर्षी मात्र येथील अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा होत असुन महाशिवरात्री निमीत्त१ मार्च रोजी सुरु झालेल्या सप्ताहांने वरसगांव नगरी हरिनामाच्या जयघोषाने दुमदमली असून राज्यातील सुप्रसिध्द कीर्तनकारांच्या अमृतवाणीचा लाभ उपस्थित भाविकवर्ग भक्तीभावाने घेत आहेत. या सप्तासप्रसंगी ब्रंम्हमुर्ती जग्ंनाथ महाराज , अनिल महाराज सानप,मारुती महाराज कोल्हटकर मालवंनकर महाराज (पुणे), कैलास महाराज निचीते शहापूर यांचे यांच्या अमृतमय कीर्तनाचा लाभ घेतला असुन ६ मार्च रोजी विनोदी तरुण किर्तनकार पठाडे महाराज(अहमद नगर),७ मार्च रोजी गणेश महाराज भाग्यवंत (ठाणे) ८ मार्च रोजी काल्याचे कीर्तन जगन्नाथ नाथ महाराज यांचे होइल, तर या सप्ताहात दररोज पहाटे काकड आरती, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथा अभंग, प्रवचन, हरिपाठ, जागर भजन आदी धार्मिक कार्यक्रम संपन्न होत आहेत. या सप्ताह सोहळ्याचे यशस्वीतेसाठी अदिनाथ सेवामंडळाचे अध्यक्ष अजित अंबृसकर,उपाध्यक्ष प्रभाकर सानप,रामचंद्र अंबृसकर, खजिनदार मंगेश सांनप,गणेश सानप,सेक्रेटरी अनंता अंबृसकर,तुकाराम सानप,अशोक लहाने,हिशोब तपासनिस संजय राजीवळे,रमेश सानप,राजेंद्र अंबृसकर ,व ग्रामस्थ मंडळ महिला मंडळ बचत गट व तरुण मंडळ मेहनत घेत आहेत.

## तरुणाने गळपास घेऊन संपवले जीवन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

१२ वी बोर्डाचा इंग्रजी विषयाचा पहिला पेपर होता, याच परीक्षेच्या भितीने प्रवेश प्रकाश बांगारे या युवकांने बोर्डाच्या पेपरच्या भितीमुळ त्याने शाळेच्याबाहेर जंगलात साधरण ८ च्या दरम्यान गळफास घेऊन आपले जिवन संपवले. मूळ राहणार पिंपळगाव, पोस्ट नागोठणे वय वर्ष १७ असुन हा विद्यार्थी सानेगाव मध्ये शिकण्यासाठी होता.

गेली दोन वर्ष लॉकडाऊन मध्ये ऑनलाइन पद्धतीने मुल शिकत घेत होती. गावकडील भागात इंटरनेट ची सुविधा नसल्यामुळे मुलांना या दोन वर्षात नीट शिक्षण मिळालं नाही आणि आत्ता परीक्षा ऑफलाईन असल्यामुळं मुलांनमध्ये भीतीच वातावरण निर्माण झालं आहे. या विरोधात मुलांनी अनेक ठिकाणी राज्यभर निदर्शने केली तरी सुद्धा सरकार ऑफलाईन परीक्षेबाबत ठाम होते. तर घटनेचा पुढील तपास पोलीस निरक्षक संजय पाटील यांच्या मार्गदशनाखाली रोहा पोलीस करीत आहेत.

# रिलायन्स नागोठणे स्थानिक भूमिपुत्र व प्रकल्पग्रस्तांची न्यायासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

## ५४७ प्राधान्य प्रमाणपत्र धारकांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेण्यासाठी पुन्हा एल्गार

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पूर्वीची आयपीसीएल व आताची रिलायन्स नागोठणे कंपनीने येथील प्रमाणपत्रधारक स्थानिक भूमिपुत्र व प्रकल्पग्रस्त यांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून घ्यावे या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीच्या नेतृत्वात आंदोलनात्मक लढा पुकारला आहे. या लढ्याचे नेतृत्व वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियन चे संस्थापक अध्यक्ष ॲड प्रकाश आंबेडकर व भीमराव आंबेडकर करीत असल्याने भूमिपुत्रांना योग्य तो न्याय मिळेल हा विश्वास निर्माण झालाय. रिलायन्स नागोठणे स्थानिक भूमिपुत्र व प्रकल्पग्रस्तांनी न्यायासाठी वंचित बहुजन आघाडीच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात दिवसभर प्रकल्पग्रस्त ठीया मांडून बसले होते. नागोठणे स्थानिक भूमीपुत्र व प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या दालनात सायंकाळी उशिरा रिलायन्स व्यवस्थापन, प्रकल्पग्रस्त व वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी यांच्यासमवेत बैठक घेण्यात आली. यावेळी स्थानिक भूमिपुत्र व प्रकल्पग्रस्त यांनी जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांना आपल्या मागणीचे निवेदन दिले. यावेळी रायगड जिल्हाधिकारी यांनी या प्रश्नाबाबत रिलायन्स व्यवस्थापनाने जलद व सकारात्मक निर्णय घ्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी रायगड जिल्हाधिकारी यांना प्रकल्पग्रस्त व भूमिपुत्र यांच्यावतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की उर्ववीत ५४७ प्राधान्य प्रमाणपत्र धारक भूमिपुत्रांस न्याय मिळविण्याकरिता आजवर अनेक आंदोलने करण्यात आलेली आहेत. दिनांक १५/११/२०२१ रोजी रिलायन्स नागोठणे गेट बंद आंदोलन करण्यात आले असता , आंदोलनाच्या अनुषंगाने रायगड जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आणि वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड . प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये दिनांक १८/११/२०२१ रोजी आपल्या दालन कक्षात संयुक्त बैठक घेण्यात आली होती.

बैठकीच्या इतिवृत्तानुसार रिलायन्स व्यवस्थापनाने १५ दिवसांत कायमस्वरूपी कामावर रुजू असलेल्या ६ ९ ० भूमिपुत्र प्राधान्य प्रमाणपत्र धारकांची खातेनिहाय, अहवाल यादी जिल्हा कार्यालयात देणे असता, रिलायन्स व्यवस्थापनाने अहवाल यादी जिल्हा कार्यालयात दिनांक १४/१/२०२२ रोजी जमा केली होती. जमा केलेल्या अहवाल यादीची सत्यप्रत वंचित बहुजन माथाडी , ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियन आणि भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्था चोळे ते नागोठणे यांना जिल्हा कार्यालयातून देण्यात आली. दिलेल्या अहवाल यादीचे युनियन आणि संस्थेचे पदाधिकारी यांनी एकत्र वाचन करून त्रुटीनिहाय प्रत्येक गावाची फेर अहवाल यादी जिल्हा कार्यालयात जमा केली असता पुढील कार्यवाहीसाठी जिल्हा कार्यालयात चौकशी अहवालासाठी रोहा – प्रांत कार्यालयात पाठवली आहे. मात्र रोहा – प्रांताधिकारी यांच्या कार्यालयातून आजतागायत कोणतीही कार्यवाही होत नाही. अशी नाराजी स्थानिक भूमिपुत्र व प्रकल्पग्रस्थानी यावेळी व्यक्त केली. यावेळी रायगड जिल्हाधिकारी, कामगार आयुक्त, उपजिल्हाधिकारी, रोहा प्रांताधिकारी, वंचित बहुजन आघाडी चे पदाधिकारी, रिलायन्स व्यवस्थापन व स्थानिक भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त यांच्यात बैठक पार पडली. यावेळी तासभर चर्चा झाल्यानंतर रायगड जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांनी रिलायन्स व्यवस्थापणाने येत्या १० दिवसात यावर योग्य ती भूमिका घेऊन निर्णय घ्यावा असे सुचित केले. आता रिलायन्स नेमकी काय भूमिका घेणार याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान आम्हाला लवकरात लवकर न्याय मिळाला नाही तर भूमिपुत्र संस्थेशी सलग्न असलेल्या सर्व संस्था आणि वंचित बहुजन माथाडी, ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनच्या माध्यमातून आंदोलन अधिक उग्र करू असे स्थानिक प्रकल्पग्रस्त नेते गंगाराम मिनमीने यांनी सांगितले. यावेळी वंचीत बहुजन आघाडी माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनचे महाराष्ट्र राज्य सरचिटणीस सुरेश मोहिते, मकरंद कांबळे ( मुंबई, नवी मुंबई निरीक्षक) अख्तर अन्सारी (मुंबई सचिव) सिद्धार्थ दाभाडे (नवी मुंबई सरचिटणीस), भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थेचे आद्यक्ष गंगाराम मिनमीने, उपाध्यक्ष पुष्पां भोईर, सुरेश कोकाटे, राकेश जवके, रोशन जांबेकर, संजय कु थे, मनोहर माळी, अल्पेश शेलार, स्मिता दाभाडे, बळीराम बडे, वंचित बहुजन आघाडी रायगड जिल्हा उपाध्यक्ष ओव्हाळ, देवेंद्र कोळी, राहुल शिरसाठ( नवी मुंबई चिटणीस) प्रेम धांदे ( वंचित बहुजन आघाडी कामोठे शहर अद्यक्ष) आदींसह प्रकल्पग्रस्त व भूमिपुत्र मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कर्जत मध्ये मोफत मुत्ररोग निदान शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत मधील डॉक्टर नाझीरकर यांचे श्री नारायण हॉस्पिटल मध्ये मोफत मुत्ररोग निदान शिबिर संपन्न झाले यावेळी ४१ रुग्णांनी तपासणी करून घेतली

जे. जे. हॉस्पिटल मुंबई चे यूरोलॉजीस्ट डॉ. प्रकाश संकपाळ यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले याप्रसंगी श्री नारायण हॉस्पिटलचे डॉ. घन:श्याम नाझिरकर, नगरसेविका विशाखा जिनगरे, विजय जिनगरे, डॉ. अलका नाझिरकर, डॉ.किरण सोनावणे, डॉ. चिदानंद नाझिरकर, डॉ. शुभंकर नाझिरकर, किरण निचिते आदी उपस्थित होते.

या शिबिरात मूत्रपिंड, मूत्रवाहिनी, मूत्राशय खडा, प्रोस्टेट संबंधित आजार, वारंवार लघवी होणे, लघवीला फेस येणे आदी आजारांवर जे. जे. हॉस्पिटलचे डॉ. प्रकाश संकपाळ यांनी तपासणी करून मोफत औषधे दिली.



## म्हसळा शहर कॉँग्रेस सदस्य रहमान कुरुक्कर यांचा राजीनामा

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा शहर कॉँग्रेसचे क्रियाशील कार्यकर्ते रहमान कुरुक्कर यांनी व्यक्तीगत कारण सांगून दोन ओळींचा पत्र देवुन तालुका कॉँग्रेसचे अध्यक्ष डॉ.मुईज शेख यांचे कडे कॉँग्रेस सदस्यत्वाचा राजीनामा देत असल्याचे कळविले आहे. म्हसळा नगरपंचायत निवडणुकीत ते ओबीसी आरक्षण असते वेळी त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. ओबीसी आरक्षण रद्द झाल्याने त्यांची उमेदवारीची संधी हुकली होती. निवडणूक प्रकिया पूर्ण झाले नंतर त्यांनी आपणांस पक्षाचे काम करण्यास वेळ मिळत नसल्याचे कारण सांगुन तडकाफडकी राजीनामा दिला आहे. म्हसळा शहर कॉँग्रेसमध्ये आजी माजी कार्यकर्त्यांमध्ये नाराजी नाट्य सुरू असल्याचे आनखी एका माजी प्रमुख पदाधिकारी यांनी माहिती देताना सांगितले.

## मुरुडचे छायाचित्रकार नितीन शेडगे यांना रायगड भूषण पुरस्कार

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड जंजिऱ्याचे छायाचित्रकार व मुरुड तालुका पत्रकार संघाचे सहसचिव नितीन शेडगे यांना नुकताच रायगड जिल्हा परिषदेतर्फे देण्यात येणारा २०२०-२१ चा रायगड भूषण पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे. शेडगे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून विविध प्रथितयश वर्तमानपत्रांतून सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय अशा विविध विषयांवर छायाचित्रे व वृत्तलेखन प्रसिद्ध केले आहेत. तसेच त्यांना यापूर्वी रायगड जिल्हा पत्रकार संघ, रायगड जिल्हा श्रमिक पत्रकार संघ, कोकण रत्न पर्यटन विकास संस्था, मुरुड नगरपरिषद व पर्यटन महोत्सव समिती इत्यादी अनेक संस्थांकडून उत्कृष्ट छायाचित्रकार पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्राप्त झाले आहेत. तसेच जिल्ह्यातील नामवंत अश्या रायगड जिल्हा फोटोग्राफी असोसिएशनने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय फोटोग्राफी स्पर्धेत विशेष प्राविण्य



मिळविले आहे.

रोहा, नागोठणे, श्रीवर्धन, मुरुड, मुंबई आदी ठिकाणी शेडगे यांचे छायाचित्र प्रदर्शन मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले आहेत. नितीन शेडगे यांना नुकतेच २०२० साली दिल्ली येथील जेसीएम फोटोग्राफी सोसायटीने फोटोग्राफी सोसायटी ऑफ अमेरिकेच्या मान्यतेने आयोजित केलेल्या जागतिक स्तरावरील फोटो सार्धेत सर्टिफिकेट ऑफ स्तरा-वरील फोटोग्राफी स्पर्धेत सर्टिफिकेट ऑफ मेरिट व २०21 साली झालेल्या स्पर्धेत गोल्ड मेडल प्राप्त झाले होते. यामध्ये जगातील २० देशांतील सुमारे ३०० स्पर्धकांनी भाग घेतला होता.

चेन्नई येथील इंडियन इंटरनॅशनल ग्रुपने आयोजित केलेल्या राष्ट्रीय स्थरा-वरील स्पर्धेत एक्सलन्स इन फोटोग्राफी अवॉर्ड मेडल प्राप्त झाले असून हे छायाचित्र चेन्नई येथे छायाचित्र प्रदर्शनात सहभागी करण्यात आले होते. सामाजिक क्षेत्रात कार्य करताना नितीन शेडगे यांनी संजय गांधी निराधार योजना समितीवर ५ वर्षे सदस्य म्हणून तर विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून उल्लेखनीय कार्य केले आहे. नितीन शेडगे यांच्या कलेची दखल रायगड जिल्हा परिषदेने घेऊन त्यांना रायगड भूषण पुरस्कार जाहीर केल्याने सर्व स्थरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सदरचा पुरस्कार रविवार, दिनांक ६ मार्च रोजी अलिबाग येथे मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहे.

## पनवेल तालुक्यात लहान मुलाला चावला साप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका १० वर्षीय लहान मुलाला साप चावल्याने त्यात त्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना तालुका परिसरातील शिवणसई येथे घडली आहे.

साजन वाघे असे या मृत मुलाचे नाव असून तो आपल्या आजीच्या गावी शिवणसई येथे राहत असे. तो घराच्या बाहेर खेळत असताना त्याला घोणस जातीच्या सापाने दंश केल्याने त्यात त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## प्रितमदादा म्हात्रे चषक २०२२ या क्रिकेट सामन्याचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खंडोबा ग्रुप, बोकडविरा मंडळ आयोजित प्रितमदादा म्हात्रे चषक २०२२ या क्रिकेट सामन्याचे पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी शुभारंभ करून खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

यावेळी त्यांच्यासह बोकडविरा ग्रामपंचायत सरपंच सौ.मानसी पाटील, लायन्स क्लबचे जिल्हा चेअरमन सदानंद गायकवाड, गणपती देवस्थान ट्रस्टी मनोज पाटील, ग्रामसुधार मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत पाटील, सामाजिक कार्यकर्ते अरविंद पाटील, उपाध्यक्ष रुपेंद्र ठाकूर, रायगड भूषण यशवंत ठाकूर, बंगळुरू बुल्सच्या संघातून खेळणारे राष्ट्रीय कबड्डीपट्टू मयूर कदम, ग्रामपंचायत सदस्य राकेश पाटील, सदस्या सौ.वंदना पाटील, शितल पाटील, निर्मला पाटील, कॉँग्रेस नेते जयवंत पाटील, युवानेते गिरीश पाटील, रायगड जिल्हा कबड्डी संघातील महिला कबड्डीपट्टू .श्रावणी पाटील व अन्य मान्यवर, ग्रामस्थ व खेळाडू उपस्थित होते.



यावेळी विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांनी बोकडविरा गावातील कबड्डीपट्टू बंगळुरू बुल्स संघातून खेळणाऱ्या मयूर कदम याची भारतीय संघात निवड झाल्याबद्दल त्याचे सत्कार करून अभिनंदन केले. तसेच रायगड जिल्हा महिला कबड्डी संघात निवड झालेल्या महिला कबड्डीपट्टू श्रावणी पाटील हिचे देखील सत्कार करून अभिनंदन केले.

### १० मार्चला जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम

## दिशा सांस्कृतिक ग्रुपतर्फे मुली व महिलांसाठी मिस ॲण्ड मिसेस पोलादपूर स्पर्धेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

कोरोना लॉकडाऊनच्यापूर्वी पोलादपूर शहरातील दिशा सांस्कृतिक ग्रुपतर्फे मुली व महिलांसाठी जागतिक महिला दिनानिमित्त आयोजन करण्यात आले होते. लॉकडाऊन काळात जागतिक महिला दिनानिमित्त कोणतेही कार्यक्रम आयोजित करण्यात आले नव्हते. पण यावर्षी दिशा सांस्कृतिक ग्रुप पुन्हा मिस ॲण्ड मिसेस पोलादपूर २०२२ ही सौंदर्यवतींसाठी स्पर्धा आणि फनी गेम्सचे आयोजन करून जागतिक महिला दिनाच्या उत्सवासाठी सज्ज झाला आहे.

पोलादपूर शहरातील सुविद्य महिलांनी गेल्या काही वर्षांपासून एकत्र येऊन स्थापन केलेल्या दिशा सांस्कृतिक ग्रुपच्या माध्यमातून विविध सांस्कृतिक, सामाजिक, हस्तकला वस्तू विक्रीविषयक, दिवाळीपूर्व वस्तूंची विक्री, रेकॉर्डडान्स, गौरी-गणपतीनिमित्त भोंडला आणि सौंदर्यस्पर्धेचे आयोजन अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यापूर्वी २०१६ व २०१७ साली दिशा सांस्कृतिक ग्रुपने मुली व महिलांसाठी जागतिक महिला दिनानिमित्त मिस ॲण्ड मिसेस पोलादपूर स्पर्धेचे आयोजन केले होते.

यंदा गुरूवार, दि. १० मार्च २०२२ रोजी कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये सायंकाळी ५ वाजता मिस ॲण्ड मिसेस पोलादपूर स्पर्धे चे आयोजन करण्यात आले असून यावेळी फनी गेम्सचे आयोजनही करण्यात आले आहे. स्वत:ची ओळख, वेस्टर्न फेरी आणि प्रश्नमंजुषा अशा तीन फेऱ्यांमध्ये या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

इच्छुक महिला स्पर्धकांनी श्रा-वणी शहा ८०८७५८६३२६, सारिका पालकर ९९६०००८१५७, आदिती नगरकर ८४४६५११५६३, उज्वला शेठ ९८९०२६०२९१, सोनिया शेठ ८१४९७७८२२१ यांच्याकडे अधिक माहितीसाठी संपर्क साधण्याचे आवाहन दिशा सांस्कृतिक ग्रुपतर्फे करण्यात आले आहे.

## साळाव- मुरुड रस्त्यावरील खड्ड्यांचे विघ्न संपणार कधी ? वाहनचालक व प्रवासीवर्ग हैराण

### तातडीने खड्डे बुजवा : मुरुड-जंजिरा मिनिडोअर चालक -मालक कल्याणकारी संघटना तीव्र आंदोलनाच्या पावित्र्यात

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

साळाव – मुरुड रस्त्यावर गेल्या अनेक महिन्यांपासून विहूर पूल, नवीन मजगांव, उसरोली फाटा, नांदगाव मच्छिमार्केट, स्टेट बँक, वाघोबा मंदिर, दांडा, काशिद बीच, यु-टर्न, बोर्ली स्टॅण्ड, कोर्लई, साळाव पूल – चेकपोस्ट नाका रस्त्यावर गेल्या अनेक दिवसांपासून असलेले खड्ड्यांचे विघ्न संपणार कधी ?असा संतप्त सवाल विचारला जात असून यामुळे पर्यटक, वाहनचालक व प्रवासीवर्ग हैराण झाला असून तातडीने खड्डे बुजविण्यात यावेत. अशी मागणी मुरुड जंजिरा मिनिडोअर चालक -मालक कल्याणकारी संघटनेच्या वतीने अध्यक्ष परवेझ कापसे, उपाध्यक्ष मिथून ग्रेसेस यांनी केली असून संघटना याविरोधात तीव्र आंदोलनाच्या पावित्र्यात असल्याचे समजते.



खड्ड्यांच्या त्रासानंतर गेल्या अनेक दिवसांपासून साळाव – मुरुड रस्त्यावर अनेक ठिकाणी असलेल्या झाडाझुडुपांचा विळखा तसेच काही ठिकाणी खाली आलेल्या झाडांच्या फांद्या वाहतुकीला अडथळा ठरत असून विहूर,मोरे ते मजगांव, उसरोली फाटा, नांदगाव बाजार ते बाजारपेठ, वाघेश्वर नगर, दांडा, सर्वे, काशिद, काशिद यु-टर्न, बारशिव, बोर्ली स्टँड, कोर्लई भागात रस्त्यावर खड्ड्यांमुळे प्रवासी व वाहनचालक यांना त्रास व हाल सहन करावा लागत आहे. याकडे संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षा बाबत नाराजीचा सूर दिसून येत असून रस्त्याच्या साईडपट्ट्या साफ करण्याची मागणी केली जात आहे. तसेच काही ठिकाणी रस्त्यावर झाडांच्या फांद्या वाहतुकीला अडथळा ठरत आहे. मुरुड -जंजिरा किल्ला, काशिद बीच पर्यटनात याठिकाणी पर्यटकांची रेलचेल असते तर शनिवार रविवार रस्त्याच्या दुतर्फा वाहनांच्या रांगा असून वेळप्रसंगी ट्रॅफिक जॅम ला सामोरे जावे लागते आहे.

साळाव – मुरुड रस्त्याच्या दुरावस्थे बाबत वेळोवेळी वृत्त पत्रातून देण्यात आलेले वृत्त सामाजिक कार्यकर्ते, विविध पक्षीय संघटनांची मागणी लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे या रस्त्यावर विहूर, मोरे, सर्वे भागात डांबरीकरण करण्यात आले आहे.यात विहूर पेट्रोल पंप ते मोरे नवीन मजगांव दरम्यान रस्त्यावरील डांबरीकरण उखडल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने यात तातडीने लक्ष पुरवून या रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात यावेत अशी मागणी होत असून याविरोधात मुरुड जंजिरा मिनिडोअर चालक-मालक संघटना तीव्र आंदोलनाच्या पावित्र्यात असल्याचे समजते.